



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : २२४ वा मंगळवार दि २९ ऑक्टोबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# शरद पवार अध्यक्ष असणाऱ्या संस्थेच्या चौकशीचे आदेश, फडणवीसांकडून पवार काका-पुतण्याची कोंडी?

**वृत्तसंस्था/ पुणे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पवार काका-पुतण्याला मोठा धक्का दिला असल्याची चर्चा सुरू झाली आहे. कारण शरद पवार अध्यक्ष असणाऱ्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आले आहेत. यामुळे मुख्यमंत्र्यांकडून दोन्ही पवारांची कोंडी केली जात आहे का? असा प्रश्न चर्चिला जात आहे. राज्यातील ऊस उद्योगाशी संबंधित महत्त्वाची संस्था असलेल्या वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिट्यूट () द्वारे मिळालेल्या सरकारी निधीचा वापर योग्य पद्धतीने केला जात आहे का, याबाबत आता शासन स्तरावर आता पडताळणी सुरू होणार आहे. यासाठी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती स्थापन करण्याचे निर्देश मंत्रिमंडळ उपसमितीने दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अलीकडेच झालेल्या साखर उद्योग नियोजन बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा झाली. दरवर्षी ऊस गाळप हंगामात राज्यातील साखर कारखान्यांकडून प्रति टन गाळपावर एक रुपया या प्रमाणात निधी कपात करून तो व्हीएसआयला देण्यात येतो. हा निधी साखर उद्योगातील संशोधन, तांत्रिक प्रगती आणि प्रशिक्षण यासाठी वापरला जाण्याचा उद्देश आहे. मात्र, या अनुदानाचा प्रत्यक्ष वापर मूळ हेतूनुसार होत आहे का, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याने शासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत. सन २००९-१० पासून लागू असलेल्या या योजनेच्या पार्श्वभूमीवर समिती सविस्तर तपासणी करून आपला अहवाल राज्य सरकारला सादर करणार आहे. या चौकशीवर आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सुद्धा प्रतिक्रिया व्यक्त केली असून मुख्यमंत्र्यांनी आता ठाण्याकडून आपला मोर्चा बारामतीकडे वळवला असल्याची टीका त्यांनी केली आहे. राज्यातील ऊस उत्पादनातील वाढीच्या माध्यमातून साखर उद्योगाला चालना देण्यात मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचा () सर्वांत मोठा वाटा आहे. पवार साहेबांच्या अध्यक्षतेखाली अजितदादांसह सर्वपक्षीय नेते पक्षाच्या पलीकडं जाऊन केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी गेल्या अनेक वर्षांपासून या संस्थेवर काम करतात. तरीही या संस्थेच्या चौकशीचे मुख्यमंत्र्यांनी दिलेले आदेश ही केवळ नियमित प्रक्रिया नाही तर भाजपने ङ्गठाण्यानंतरफ आपला मोर्चा आता ङ्गबारामतीकडंफ वळवल्याचा त्याचा अर्थ आहे. भाजपला कुबड्यांची गरज नाही हे कालच गृहमंत्री अमित शाह साहेबांनी स्पष्ट केलं आणि सोबतच च्या चौकशीचे मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले. हा कुबड्यांवरील अवलंबित्व कमी करण्याचा तर प्रयत्न नाही



ना! हे लवकरच स्पष्ट होईल, असं रोहित पवार म्हणाले आहेत. दरम्यान, महत्त्वाचं म्हणजे जिथं आम्ही कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे पुरावे देतो तिथं सरकार मौन बाळगतं, चौकशी करत नाही, पण राजकीय द्वेषातून एका चांगल्या संस्थेची चौकशी करून संस्थेचं नाव बदनाम केलं जातं, हे भाजपाचं आधुनिक राजकारण आहे. यातून कदाचित भाजपचा राजकीय डाव साध्य होईल, पण राज्याचं मात्र नुकसान होतंय, त्याचं काय? असा सवालही रोहित पवारांनी विचारला आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाला चढली झिंग! अवैध हातभट्टी दारूमुळे शेकडो संसार उघड्यावर!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील ग्रामीण भागाकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाने सपशेल दुर्लक्ष केल्याने युवक मोठ्या संख्येने अवैध हातभट्टी दारूच्या आहारी गेले असून हजारो संसार या व्यसनामुळे उघड्यावर आले आहेत. ग्रामीण भागाकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कायमच दुर्लक्ष केल्याने अवैध हातभट्टी दारू गाळणाऱ्यांची संख्या वाढली आहे. यातूनच तरूणांना हातभट्टीचे व्यसन जडल्याने कायदा व सुव्यस्था धोक्यात आल्याचे चित्र आहे. मध्यंतरी राज्य उत्पादन शुल्क विभागाने रक्तदानाचा उपक्रम राबवून पाठ थोपटून घेतली मात्र कर्तव्यात कमतरता जाणवत आहे. सर्वत्र अवैध दारूचा महापूर वाहत आहे. मोह, गुळ आणि तुरटी याला एकत्र करून आठ दिवस एका ड्रमामध्ये त्याला सडवतात त्या नंतर सडवलेल्या मोहाला उकळून त्या पासून दारू बनवतात. यामध्ये कोणी जिवघेणे केमिकल टाकून अवैध हातभट्टी दारू गाळतात त्यामुळे पिणाऱ्यांना नशा झटकेपट चढते. या विषारी गावठी दारू मुळे अनेक जण दगावल्याची घटना घडली आहे. तरीही राज्य उत्पादन शुल्क विभाग याकडे दुर्लक्ष करत आहे, त्यामुळे ग्रामीण भागात व्यसन करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. विशेष म्हणजे हातभट्टी दारू पेट्रोल पेक्षा जास्त वेगाने आग पकडते.गावगाड्यात हातभट्टी गाळणाऱ्यांची संख्या वाढली. त्यामुळे ग्रामीण भागात घराघरात वादविवाद होण्याच्या घटना घडत आहे. दारूच्या व्यसनी गेलेली व्यक्ती




हे दारूची तलब भागविण्यासाठी घरातील महिलांना मोलमजुरी साठी पाठवतात आणि मोलमजुरी करून आणलेल्या पैशावर पुरुष दारूचे व्यसन करतात. पैसे न दिल्यास घरातली महिलांना मारहाण देखिल करतात. यातून हजारो संसार उद्ध्वस्त झाल्याच्या घटना घडल्या आहे. कौटुंबिक प्रश्न दारुमुळे निर्माण झालेले आहे. दारूमुळे वर्षाला कितीतरी अपघात होतात. चोरीच्या गुन्ह्याला प्रोत्साहनाचे मुळ कारण कारण दारु आहे. दारूसारख्या जिवघेण्या पदार्थाला राज्य उत्पादन शुल्क विभाग प्रोत्साहन का देते?असा सवाल उपस्थित केला जातोय

# संमती कुठल्या टप्प्यावर?

सांस्कृतिक बाबी आणि स्त्री-पुरुष संबंधांच्या बाबतीत भारतीय समाज नेहमीच दुभंगलेला राहिला आहे. बालविवाह हे केवळ स्त्रिया आणि मुलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी हानीकारक आहेत, हे स्वीकारायला आपल्याला चार शतकांचा कालावधी लागला. आजमितीस लैंगिक संबंधांसाठी संमतीचे वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले आहे, परंतु या प्रवासात अनेक टप्पे आणि कायदेशीर बदल झालेले आहेत. संमती वयाच्या कायदेशीर प्रवासाचा ऐतिहासिक आढावा असा. सन १८०० : या काळात अगदी बालवयात लग्न करून मुली वयात येताच (उदा. ११-१२व्या वर्षी) पतीसोबत लैंगिक संबंध ठेवणे सर्वमान्य होते., १८६० : भारतीय दंड संहितेअंतर्गत (आयपीसी) लैंगिक संबंधांसाठी संमतीचे वय १० वर्षे निश्चित करण्यात आले., १८९१ : फुलमणी दास प्रकरणानंतर हे वय १२ वर्षे करण्यात आले., १९४० : हे वय १६ वर्षांपर्यंत वाढवण्यात आले., २०१२ : बाललैंगिक शोषणाविरोधातील पोक्सो कायदा अस्तित्वात आल्यानंतर हे वय १८ वर्षे करण्यात आले., २०१३ : या कायद्याचा परिणाम म्हणून, गुन्हेगारी विषयक कायद्यातील कलम ३७५मध्ये लैंगिक संबंधांसाठी संमतीचे वय स्पष्टपणे १८ वर्षे निश्चित करण्यात आले., २०२३ : भारतीय दंडविधान कलम ३६६ए मधील ङ्गअल्पवयीन मुलगीफहा शब्द बीएनएसच्या कलम ९६ मध्ये ङ्गबालकफ(चाइल्ड) असा बदलण्यात आला आहे. ज्यामुळे १८ वर्षांखालील पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही मुलांना संरक्षण मिळते. गेल्या काही वर्षांत १८ वर्षे वयाखालील मुलींनी संमतीने शारीरिक संबंध ठेवल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. या परिस्थितीत अनेक गुंतागुंतीचे पैलू आहेत. संवर्ग आणि वैयक्तिक संबंधः यात स्वेच्छेने केलेले स्वजातीय, आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंतरवर्गीय, आंतरभाषिक, तसेच आंतरराष्ट्रीय विवाहांचा समावेश आहे., फूस लावून पळवून नेणे आणि सामूहिक बलात्कार : अनेकदा मुलींना फ ूस लावून, दिशाभूल करून पळवून नेले जाते आणि नंतर त्यांच्यावर सामूहिक बलात्कार केले जातात. अशावेळी आरोपी ङ्गतिची संमती होतीफ असा दावा करतात., ग्रामीण भागातील शोषण : ग्रामीण भागात १७-१८ वर्षांच्या मुलींना हेरून त्यांच्याशी संबंध ठेवले जातात आणि बाळंतपण १८ वर्षांनंतर होईल अशी व्यवस्था केली जाते. अनेकदा आरोपीचा स्वतःचा विवाह झालेला असूनही, तो मुलीला आणि तिच्या कुटुंबाला लग्नाला संमती देण्यास भाग पाडतो., पालकांकडून कायद्याचे उल्लंघनः परिस्थिती, सुरक्षिततेच्या मर्यादा, रीतीरिवाज किंवा मोठ्या मुलीला योग्य वर न मिळणे यांसारख्या कारणांमुळे पालकही मुलींचे बालविवाह करण्यास तयार होतात. अल्पवयीन मुलगी गरोदर राहिल्यास डॉक्टरांसमोर समस्या निर्माण होतात. पोलिसांकडून काही ठिकाणी दुर्लक्ष होते, तर काही राज्यांमध्ये पोक्सो कायद्यानुसार अल्पवयीन मुलीशी संबंध ठेवणारे पती गुन्हेगार ठरतात. अशावेळी मुलीला १८ वर्षांची होईपर्यंत बालगृहात ठेवले जाते आणि नंतर न्यायालय तिच्या इच्छेनुसार निर्णय घेऊन दोघांचा संसार सुरू करू शकते. जर मुलगी पळून गेली असेल किंवा पालकांनी तक्रार दाखल केली असेल, तर न्यायालय सर्व बाजूंनी विचार करून आणि वैद्यकीय तपासणीच्या आधारावर निर्णय देते. बलात्काराच्या प्रकरणांमध्ये, आरोपींचे वकील मुलीची ङ्गसंमतीफ होती हे सिद्ध करण्यासाठी ङ्गरिक्षात बसली, पैसे घेतले, काहीच बोलली नाही, आमचे पूर्वीच संबंध होतेफ असे दावे करतात. संमतीचे वय १८वरून १६ करावे, अशी मागणी काही जणांकडून केली जाते, कारण ते स्वैच्छिक संबंधांच्या स्वातंत्र्याचे समर्थक आहेत. मात्र, या मागणीत सुरक्षित संबंध आणि दोघांच्या जबाबदारीकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. वैद्यकीय गर्भपात कायद्यानुसार (एमटीपी) गर्भपातासाठीही १८ वर्षांचे वय आवश्यक आहे. अल्पवयीन मुलींना सुरुवातीच्या काही महिन्यांत गरोदर असल्याचे लक्षात येत नाही. १६ आठवड्यांनंतर गर्भपात धोकादायक असतो आणि त्यासाठी पोलिसांकडून सरकारी रुग्णालयातून परवानगी घ्यावी लागते, ज्यामुळे मुलीची आणि तिच्या कुटुंबाची परवड होते. अनेकदा हे प्रकरण न्यायालयात जाते आणि आरोपी जामिनासाठी धडपडतात. काही घटनांमध्ये अल्पवयीन मुलगी आश्रमात बाळंत होते आणि त्या बाळाच्या आई-वडिलांना शोधण्याची जबाबदारी महिला व बालविकास विभागावर येते. असे ङ्गपुरुषफ कोणतीही जबाबदारी घेत नाहीत, तर जन्माला आलेल्या बाळाचा डीएनए जन्मदात्याचा असतो आणि त्याचा त्याच्या संपत्तीत वाटा असतो. सर्व स्त्री-प्रसूतीतज्ज्ञांच्या मते, सुरक्षित मातृत्वाचे वय साधारणतः २० वर्षांनंतरचे असते. १६ ते १८ वयोगटातील सर्वच मुला-मुलींना स्वातंत्र्य, स्वतःच्या शरीरावर स्वतःचा अधिकार आणि जबाबदारीची जाणीव असतेच, असे नाही. प्रेम, एकतर्फी प्रेम, शारीरिक संबंधांनंतरचा दुरावा आणि समाजातील दुटप्पी नियम यांमुळे या वयातील मुला-मुलींचे फार मोठे वैयक्तिक नुकसान होऊ शकते. गुन्हेगारी कायद्यातील तरतुदींचा जाणीवपूर्वक गैरफायदा घेऊन दुसऱ्या व्यक्तीचे अधिकार आणि सुरक्षिता यांवर आक्रमण करण्याची संधी दिली जाऊ नये. विवाह अंतर्गत बलात्काराच्या संदर्भात, विशेषतः मुस्लिम संरक्षण कायद्यात, १५ ते १८ वर्षे वयोगटातील विवाहित मुलीसोबत पतीने दबाव आणून ठेवलेले संबंध बलात्कार मानले जात नाहीत, या मुद्द्यावर समाजात आणि पालकांमध्ये अस्वस्थता आहे. अल्पवयीन मुलगी घरातून निघून गेल्यावर तिची प्रत्यक्ष इच्छा काय आहे हे समुपदेशक, बाल न्यायालये आणि पोलिस यांना शोधावे लागते. तिची इच्छा दबावमुक्त, भावनिक सक्तीतून आलेली आहे, की पालकांच्या घरी परत जाण्याचे दोर कापण्यासाठीचा तो एक मार्ग आहे, याचाही विचार कायदा आणि न्यायसंस्थांना करावा लागतो. गेल्या काही वर्षांपासून वेठबिगारी, मानवी तस्करी, अमली पदार्थ आणि शस्त्रांचा व्यापार, तसेच सायबर गुन्हे यांसारख्या संघटित गुन्ह्यांमध्ये लहान मुला-मुलींचा जाणीवपूर्वक वापर केला जात आहे. मुलांच्या लहान वयाचा फायदा घेऊन वयाने मोठे असलेले सूत्रधार गुन्ह्यातून निसटतात. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊनच विधी आयोग, संयुक्त राष्ट्र संघाच्या बाल हक्क करार आणि विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी असलेल्या ङ्गजे.जे.फ (ज्युनियर जस्टिस) कायद्यात वयोमर्यादा १८ वर्षे ठरवण्यात आली आहे. पोक्सो कायद्याखाली ज्या मुली पीडित आहेत, त्यात अल्पवयीन मुलींची संख्या मोठी आहे. काही प्रकरणांमध्ये मुलींचे वय आणि पुरुषाचे वय यात काही दशकांचा फरक असतो. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडू येथील काही प्रकरणांतील अमानुषता घातक असून मुलींच्या दिशाभूलीला उत्तेजन देणारी आहे. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचे असे काही निर्णय बदलले आहेत, ज्यात मुलींच्या आणि आरोपीच्या नात्याचे उदात्तीकरण करून आरोपींना सोडण्यात आले होते. तसेच, ङ्गआय लव्ह यूफम्हणणे गुन्हा नाही किंवा मुलीचा पायजमा काढणे फारसे आक्षेपार्ह नाही, असे काही न्यायालयांनी केलेले भाष्यही सर्वोच्च न्यायालयाने बदलले आहे. जोपर्यंत भारतीय समाज स्त्रीची स्वेच्छा आणि जबरदस्ती यांतील फरक स्पष्टपणे ओळखत नाही, तोपर्यंत मुलींच्या संमतीची वयोमर्यादा १८ वर्षांवरून १६वर्षे करण्याचा निर्णय घाईने घेणे योग्य नाही, त्यासाठी सबुरीची आवश्यकता आहे.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जैन बोर्डिंग डील रद्द; धंगेकरांकडून गेम

## शिंदेंकडून कोणाकोणाचे हिशोब चुकते..?





**पुणे :** खासदारकीच्या पहिल्याच फटक्यात मंत्री झालेल्या मुरलीधर म ोहोळ यांच्याविरोधात जैन बोर्डिंगच्या विषयावरुन गंभीर आरोप करत शिंदेसेनेचे रविंद्र धंगेकर यांनी रान पेटवलं. विषयाचं गांभीर्य इतकं वाढलं की त्याची दखल थेट दिल्लीला घ्यावी लागली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा काल मुंबईत होते. त्यांनी भाजप कार्यालयाचं भूमिपूजन केलं. शहा मुंबईत येण्यापूर्वी वेगवान घडामोडी घडल्या. जैन बोर्डिंगच डील रद्द झालं. शिंदेसेनेच्या धंगेकरांनी हा विषय लावून धरला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आशीर्वाद असल्याशिवाय धंगेकर इतकं धाडस करणार नाहीत. त्यामुळे मोहोळांवर गंभीर आरोप करुन शिंदेंनी नेमकं काय साधलं, याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.गुंड निलेश घायवळ प्रकरणात शिंदेसेनेनं आक्रमक भूमिका घेतली होती. त्यांच्या निशाण्यावर भाजपचे वरिष्ठ नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील होते. पण त्यांच्या मदतीला कोणीही धावलं नाही. पाटील यांनी एकट्यानं खिंड लढवली. त्यामुळे पुण्यात भाजपला अस्वस्थ करण्याचा शिंदेसेनेचा पहिला डाव फोल गेला. पण त्यानंतर जैन बोर्डिंग प्रकरणात शिंदेसेनेला दुसरी संधी मिळाली. शिंदेसेनेचे महानगरप्रमुख असलेल्या रविंद्र धंगेकर यांनी ही संधी सोडली नाही. धंगेकर जैन बोर्डिंग प्रकरणात केंद्रीय राज्यमंत्री असलेल्या मुरलीधर मोहोळ यांच्यावर दररोज आरोप करत राहिले. सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून धंगेकर यांनी दररोज एक बाण मारला. त्यात मोहोळ पुरते घायाळ झाले. साधा आमदारही नसलेला शिंदेसेनेचा एक नेता भाजपच्या केंद्रीय राज्यमंत्र्याच्या नाकीनऊ आणू शकतो, हे शिंदे यांनी जैन बोर्डिंग प्रकरणात दाखवून दिलं. केंद्रात मोहोळ हे अमित शहांच्या विभागाचे राज्यमंत्री आहेत. त्यावरुन शिंदेंनी खेळलेल्या डावाचं गांभीर्य कळून येतं. विशेष म्हणजे शिंदेंनी विषय तुटेपर्यंत ताणला नाही. अमित शहा मुंबईत येण्याआधी या विषयावर पडदा पडला होता.जैन बोर्डिंग प्रकरणात मोहोळ यांच्यावर झालेल्या आरोपांचं टायमिंग महत्त्वाचं आहे. महापालिकांचा धुरळा उडण्याआधी मोहोळ लक्ष्य झाले आहेत. पुणे महापालिकेची जबाबदारी त्यांच्यावरच असणार आहे. पुणे भाजपत त्यांचं स्थान बरंच वर आहे. महापालिकेची तिकिटं मोहोळच देणार असल्यानं त्यांच्या बचावासाठी भाजपमधील अनेक जण सरसावले. त्यामुळे धंगेकर यांना अपेक्षित परिणाम साधता आला. पुण्यात भाजपला धक्का देण्यात धंगेकर यशस्वी ठरले. या सगळ्याला शिंदेंचा मूक पाठिंबा होता. लोकसभा निवडणुकीत भाजपचा राज्यात धुव्वा उडाला. भाजपला केवळ ९ जागा मिळवता आल्या. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठा या समीकरणाचा विचार करत भाजपनं पहिल्याच टर्मचे खासदार असलेल्या मुरलीधर मोहोळ यांना मंत्रिपदाची संधी दिली. अमित शहा कॅबिनेट मंत्री असलेल्या सहकार खात्याचं राज्यमंत्रिपद त्यांना देण्यात आलं. भाजपचा तोच आश्वासक चेहरा शिंदेसेनेनं जैन बोर्डिंग प्रकरणानं पद्धतशीरपणे डॅमेज केला आहे.

## शिवसेनेतील पितापुत्र 'कमळ' धरणार!



**सोलापूर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वीच भाजपने महायुतीमधील मित्रपक्षांना जबरदस्त धक्का दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील म ाजी आमदार राजन पाटील, यशवंत माने आणि माजी आमदार बबनदादा शिंदेंचे पुत्र असलेले रणजित शिंदे यांचा मुंबईत भाजप पक्षात प्रवेश होणार आहे. भाजपने राष्ट्रवादी सोबतच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला देखील ऑपरेशन लोटसचा धक्का दिला आहे. शिवसेना पक्षातील सोमेश क्षीरसागर भाजपात घरवापसी करणार आहेत. भाजपच्या ऑपरेशन लोटसने महायुतीम धील मित्र पक्षांना जोर का झटका दिला आहे.मोहोळ तालुक्यातील राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने यांच्यासह लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील, युवक काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष अजिंक्यराणा पाटील यांच्यासह मोहोळ तालुक्यातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अनेक पदाधिकाऱ्यांसह सुमारे एक हजार कार्यकर्ते मुंबई येथे बुधवार २९ ऑक्टोबर रोजी भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये आता शिस्त राहिली नाही, असा आरोप करीत माजी आम दार राजन पाटील यांनी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यासमवेत माजी आमदार यशवंत मानेंसह तालुक्यातील अनेक राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश घेण्याचे निश्चित केले आहे. २९ ऑक्टोबर रोजी भाजपच्या कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा होणार आहे.मोहोळचे शिवसेना नेते नागनाथ क्षीरसागर आणि सोमेश क्षीरसागर भाजपात प्रवेश करणार आहेत. मोहोळच्या क्षीरसागर पिता-पुत्रांची पाच वर्षांनी भाजपमध्ये घरवापसी होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मोहोळमधील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते नागनाथ क्षीरसागर आणि त्यांचे चिरंजीव सोमेश क्षीरसागर हे पितापुत्र सुमारे पाच वर्षांनंतर भारतीय जनता पक्षात घरवापसी करत आहेत.मोहोळचे क्षीरसागर कुटुंबीय हे आधी जनसंघात आणि त्यानंतर भारतीय जनता पक्षात कार्यरत होते. नागनाथ क्षीरसागर यांनी भाजपच्या कमळ चिन्हावर पंढरपूर लोकसभा मतदारसंघातून १९९९ आणि २००४ मध्ये निवडणूक लढवली होती.

## अतिवृष्टीग्रस्तांसाठी आणखी ११००० कोटी ; १५ दिवसांत खात्यात जमा होणार



**मुंबई :** राज्यातील अतिवृष्टीग्रस्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या मदत पॅकेजचा राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी आढावा घेण्यात आला. अतिवृष्टीग्रस्तांसाठी आधी आठ हजार कोटी रुपये वितरित करण्यात आले असून, आणखी ११ हजार कोटी रुपये वितरित करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. जवळपास ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहोचले आहेत. अतिरिक्त पैसे पुढच्या १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.अतिवृष्टीग्रस्तांसाठीच्या मदत पॅकेजचा आढावा घेतल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'याआधी वितरित केलेले पैसे सुमारे ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. अतिवृष्टीग्रस्तांना आणखी ११ हजार कोटी रुपये देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. पुढच्या १५ दिवसांत हे पैसे खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वेगवेगळ्या जिल्ह्यांत हा निधी वेगवेगळ्या पद्धतीने गेला आहे. जशा याद्या येतील तशी मान्यता द्यायची असा निर्णय झाला आहे. काही ठिकाणी 'एनडीआरएफ'ची मदत मिळाली, पण १० हजार मिळाले नाहीत असे झाले आहे. काही ठिकाणी १० हजार मिळाले, काही ठिकाणी दोन हेक्टरचे मिळाले आहेत. आता तीन हेक्टरचेही पैसे टाकतो आहोत.येत्या १५-२० दिवसांत ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होतील.

# शिंदेसेनेचं 'आरोग्य' बिघडणार? फडणवीसांनी 'प्रवीण' अधिकारी नेमला; 'मित्रा'रुपी खेळीनं अस्वस्थता



**मुंबई :** आजी माजी मुख्यमंत्र्यांमध्ये शीतयुद्ध सुरु असल्याची चर्चा असताना महत्त्वाची घडामोड सुरु आली आहे. आरोग्याबद्दलच्या योजनांसाठी स्वतंत्र 'वॉर रुम'ची घोषणा करण्यात आली असून त्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय प्रवीण परदेशी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. प्रवीण परदेशी मित्राचे (चखढठअ) मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.आरोग्यासंबंधीच्या योजनांसाठी स्वतंत्र वॉर रुम स्थापन करुन मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर कुरघोडी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. आरोग्य मंत्रालयाची जबाबदारी शिंदेसेनेच्या प्रकाश आबिटकर यांच्याकडे आहे. शिंदेसेनेकडे असलेल्या खात्याशी संबंधित योजनांसाठी वॉर रुम स्थापन करुन फडणवीस यांनी आरोग्य मंत्र्यांनाच शह दिला आहे. वॉर रुम स्थापन करण्याची घोषणा ८ दिवसांपूर्वी करण्यात आली. आता त्याची जबाबदारी प्रवीण परदेशी यांच्याकडे देण्यात आली आहे. गरजवंतांना वैद्यकीय मदत करण्यासाठी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी मंत्रालयात दोन स्वतंत्र वैद्यकीय कक्ष तयार केले आहेत. एकनाथ शिंदे गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना मदत कक्ष चालवतात. मुख्यमंत्री होण्याच्या आधीपासूनच शिंदे यांनी कक्षाची स्थापना केली आहे. या माध्यमातून ते राज्यभरात पोहोचले. शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर हा कक्ष मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर अधिकृतरित्या हलवण्यात आला. डिसेंबर २०२४ मध्ये शिंदे मुख्यमंत्रिपदावरुन पायउतार झाले. त्यानंतर त्यांनी वैद्यकीय मदत कक्ष मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरुन पहिल्या मजल्यावर हलवला. त्यांचा कक्ष मुख्यमंत्र्यांच्या सहाव्या मजल्याला समांतर काम करतो.आरोग्य विभागाकडून विविध योजना राबवल्या जातात. त्यातून मोफत किंवा नाममात्र दरात आरोग्य सुविधा पुरवल्या जातात. मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाकडे आर्थिक मदत मंजूर करण्याचे अधिकार आहेत. शिंदे यांच्या मदत कक्षाकडे तसे अधिकार नाहीत. शिंदेसेनेचा मदत कक्ष प्रामुख्यानं पक्ष पातळीवरुन किंवा महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून गरजूंना मदत करतो.

मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यात शीतयुद्ध सुरु असल्याची चर्चा असताना आरोग्य विभागाशी संबंधित योजनांसाठी स्वतंत्र वॉर रुमची घोषणा करण्यात आली आहे. यानंतर शिंदेसेनेच्या वैद्यकीय मदत कक्षात नाराजी आहे. वेगळी वॉर रुम तयार करुन फडणवीसांकडून शिंदेंच्या कोंडीचे प्रयत्न सुरु असल्याचं मत एका अधिकाऱ्यानं मत व्यक्त केलं. 'आरोग्य मंत्रालय आमच्या पक्षाकडे आहे आणि आरोग्य संबंधित योजनांवर मुख्यमंत्री कार्यालय नजर ठेवणार आहे. याचा स्पष्ट अर्थ मुख्यमंत्री कार्यालय नियंत्रण ठेवणार असाच होतो,' असं शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या अधिकाऱ्यानं नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर सांगितलं.

# एकनाथ खडसेंच्या बंगल्यात मध्यरात्री चोरटे घुसले; कॅश आणि सोन्याचे दागिनेही लंपास

**जळगाव :** सध्या दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने अनेक जण आपल्या कुटुंबासह बाहेर फिरायला जातात. ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हेदेखील दिवाळीनिमित्त बाहेरगावी असताना त्यांच्या जळगाव शहरातील शिवराम नगर भागातील घरी मध्यरात्री चोरट्यांनी चोरी करून ३५ हजार रुपये रोख आणि सात ते आठ तोळे सोने लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. खडसे यांच्या घरी झालेल्या चोरीच्या या घटनेमुळे जळगाव शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांचा जळगाव शहरात शिवराम नगर भागात बंगला आहे. या ठिकाणी ते वास्तव्यास असतात. मात्र दिवाळी सणानिमित्त ते कुटुंबासह बाहेर फिरायला गेलेले असताना त्यांच्या बंगल्याचा सुरक्षारक्षकही सणाच्या सुट्टीमुळे गावाला गेला होता. त्यामुळे घराला कुलूप होते. हीच संधी साधत चोरट्यांनी मध्यरात्री मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.चोरट्यांनी घरात असलेली रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने घेऊन पळ काढला.



सकाळी ही बाब आजूबाजूच्या रहिवाशांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ फोन करून घटनेसंदर्भात माहिती दिली. त्यानंतर तपासासाठी पोलीस खडसे यांच्या घरी दाखल झाले आणि स्थानिक गुन्हे शाखेची काही पथके चोरांच्या मागावर रवाना करण्यात आली असल्याची माहिती आहे.जळगाव शहरातील शिवम नगर भागात माझा बंगला आहे. दिवाळीनिमित्त वॉचमन त्याच्या गावी गेलेला आहे आणि त्या घराला सध्या कुलूप होते. मी देखील बाहेरगावी होतो. घरात माझ्या लॉकरमध्ये ३५ हजार रुपये रोख रक्कम होती. काही पाच-पाच ग्रॅमच्या दोन अंगठ्या होत्या आणि एकूण सात ते आठ तोळे सोने होते. ही रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने चोरी करण्यात आले आहेत,' अशी माहिती एकनाथ खडसेंनी दिली आहे.

दरम्यान, गेल्या महिन्यात केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या मुक्ताईनगर येथील पेट्रोल पंपावर रात्री ११ वाजेच्या सुमारात दरोडा टाकण्यात आला होता. तिथंही दरोडेखोरांनी सामानाची तोडफोड करून एक लाख रुपये मुद्दल लंपास केली होती. या घटनेला एक महिना होत नाही तोच आता एकनाथ खडसे यांच्या जळगाव शहरातील बंगल्यात मध्यरात्री चोरट्यांनी चोरी करून रोख रक्कम आणि सात ते आठ तोळे सोने लंपास केले आहे.

## वयाने मोठ्या युवतीवर प्रेम जडलं, साताऱ्यात विद्यार्थ्याने आयुष्य संपवलं

**सातारा :** अभ्यासाचा ताण आणि आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या युवतीवरील प्रेमाला विरोध होण्याच्या ताणातून एका १७ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवारी उघडकीस आली आहे. या मुलाने आपल्या ताणाची कबुली देणारी चिठ्ठी लिहून आत्महत्येपूर्वी ती वडिलांना व्हॉट्स ॲपवर पाठवली होती.

संबंधित मुलगा मूळचा सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील आहे. साताऱ्याजवळ वसतिगृहात राहून तो शिक्षण घेत होता. शुक्रवारी तो दिवाळी सुट्टी संपवून परत वसतिगृहात आला. मात्र, त्याने दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री चिठ्ठी लिहून ती वडिलांच्या व्हॉटसॲपवर पाठवली. वडिलांनी ती दुसऱ्या दिवशी वाचली. त्या वेळी त्यांना धक्का बसला. कॉलेजवर फोन करून माहिती घेतली असता, त्यानंतर ही घटना समोर आली.मृत मुलाला बहीण असून, तिचे एका मुलावर प्रेम आहे. मात्र, कुटुंबीयांकडून मुलीच्या प्रेमाला विरोध आहे. अशातच या मुलाचेही त्याच्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या युवतीवर प्रेम जडले होते. कुटुंबीयांकडून आपल्या प्रेमालाही बहिणीप्रमाणेच विरोध होईल, अशी भीती त्याला वाटत होती. त्याचबरोबर अभ्यासाचा ताण यातून मुलाने चिठ्ठी लिहून आत्महत्या केली असल्याचे पोलिसांनी सांगितले. सातारा तालुका पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह जिल्हा रुग्णालयात नेला. शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबीयांकडे सोपवण्यात आला. हवालदार किरण निकम तपास करीत आहेत.

## मित्राने लोणंदमध्ये २२ वर्षाच्या तरुणाला संपवलं

**सातारा :** खंडाळा तालुक्यातील लोणंदमध्ये २२ वर्षांच्या तरूणाची भिंतीवर डोके आपटून आणि पट्ट्याने गळा आवळून हत्या करण्यात आली आहे. ही घटना उघडकीस येताच लोणंदम ध्ये खळबळ उडाली. या घटनेचा अवघ्या दोन तासात छडा लावण्यात लोणंद पोलिसांना यश आलं आहे. गणेश संतोष गायकवाड असं मृत तरूणाचे नाव आहे. तो पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील पिंपळसुटी गावचा रहिवासी आहे. तो सध्या लोणंद येथे वास्तव्यास होता. त्याच्या अल्पवयीन रूम पार्टनरनेच हत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे.लोणंद पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश गायकवाड हा लोणंद एमआयडीसी परिसरात कामाला आणि माळीआळी परिसरात वास्तव्यास होता. पोलिसांनी ताब्यात घेतलेला संशयित अल्पवयीन मुलगा लोणंद येथे शिक्षण घेत आहे. दोघांची मेसमध्ये ओळख झाली होती. त्यानंतर दोघे एकाच खोलीत भाड्याने राहत होते.अभ्यास आणि मोबाईल वापरावरून त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर गणेश झोपेत असताना रूम पार्टनरने रागाच्या भरात त्याचे डोके भिंतीवर आपटून कमरेच्या पट्ट्याने गळा आवळल्याने गणेशचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली. तरूणाच्या हत्येची माहिती मिळताच पोलिसांनी फॉरेन्सिक टीम,



फिंगरप्रिंट आणि डॉग स्क्वॉडला घटनास्थळी पाचारण करून पुरावे गोळा करण्यात आले. या घटनेची माहिती मृताच्या रूम पार्टनरने दिली असल्याने पोलिसांनी त्याची चौकशी सुरू केली. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटू लागल्याने पोलिसांनी कसून चौकशी केली. अखेर त्याच्याच कबुली जबाबातून हत्येचा उलगडा झाला. सहायक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले, उपनिरीक्षक रोहित हेगडे आणि गुन्हे प्रकटीकरण शाखेने हा तपास केला. तरुणाच्या हत्येप्रकरणी ताब्यात घेतलेल्या अल्पवयीन संशयिताला बाल न्यायालयात हजर केलं होतं. त्याची रवानगी सुधारगृहात करण्यात आली आहे. या घटनेच्या तपासासाठी उद्या पुन्हा त्याची चौकशी केली जाणार आहे.

# महिलांच्या खासगी क्षणांचे गुप्त चित्रीकरण करण्यासाठी रिसॉर्ट चालकाने स्वच्छतागृहात बसविला छुपा कॅमेरा..

**रायगड :** अनेकदा मॉलमधील महिलांच्या चेंजिंग रूममध्ये, कधी हॉटेल किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहात हिडन कॅमेरे आढळून असल्याच्या घटना समोर आल्या आहे. अशीच एक घटना पनवेल तालुक्यतील धानसर या गावात असणाऱ्या एका रिसॉर्टमधील स्वछतागृहात घडली असून या प्रकरणी एकास ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेने महिला व मुलींच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महत्वाचे म्हणजे ही पहिलीच घटना नाही. याआधी देखील असे अनेक प्रकार समोर आले आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात असणाऱ्या धानसर गावात असणाऱ्या एका खासगी फार्म हाऊस येथे काही दिवस रोजच्या कामाच्या धकाधकीतून



काही दिवस काढून विश्रांतीसाठी कुंटुंबासाहित महिला ही आली होती. सदर फार्म हाऊस हे मूळ मालकाने काही काळासाठी मनोज चौधरी (वय ३५, रा. रांजनपाडा, खारघर) याच्याकडे भाडे तत्वावर सोपविले होते. शनिवार, २५ ऑक्टोबर रोजी मुंब्रा येथील एक कुटुंब काही दिवस निसर्गाच्या सानिध्यात घालवण्यासाठी येथे आले होते.सर्व काही मौज मजेत सुरू असतानाच, रविवारी सकाळी त्या कुटुंबातील एका तरुणाला स्वच्छतागृहातील बल्बच्या होल्डरविषयी संशय आला. त्याने तपास केला असता होल्डरमध्ये लपवलेला एक छोटा कॅमेरा सापडला. कॅमेऱ्यातील फुटेज तपासून पाहिल्यावर महिलांच्या आंघोळीचे दृश्य रेकॉर्ड झाल्याचे उघड झाले. संतापलेल्या कुटुंबीयांनी त्वरित तळोजा पोलिसांकडे तक्रार दाखल केली.वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकून आरोपीला अटक केली. तपासाची जबाबदारी पोलीस निरीक्षक सागर निकम यांच्याकडे देण्यात आली आहे. विश्रांतीसाठी फार्महाऊसवर आलेल्या महिलांच्या खासगी क्षणांचे गुप्त चित्रीकरण करण्यासाठी रिसॉर्टचालकाने स्वच्छतागृहात छुपा कॅमेरा बसविल्याचा प्रकार उघड झाला आहे.या प्रकरणात तळोजा पोलिसांनी मनोज चौधरी (वय ३५, रा. रांजनपाडा, खारघर) याला अटक केली आहे. असल्याची माहिती तळोजा पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणात गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला असून, आरोपीने महिलांच्या गोपनीयतेचा घोर भंग केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पोलिसांनी अशा घटनांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. परिसरातील महिलांनीही फार्महाऊस, रिसॉर्ट किंवा सार्वजनिक ठिकाणी वापरताना अधिक सजग राहण्याचे आवाहन तळोजा पोलिसांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वर्चस्वाची लढाई! भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात कॅनबेरात आज रंगणार टी-20 क्रिकेटचा थरार

**कॅनबेरा :** भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात बुधवारपासून येथे पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळवला जाणार असून, सर्वांच्या नजरा सूर्यकुमारच्या कामगिरीवर खिळल्या आहेत. दोन्ही संघांचा फॉर्म पाहता, ही लढत तुल्यबळ होण्याची शक्यता आहे. सामन्याला भारतीय प्रमाणवेळेनुसार, दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी सुरुवात होईल.

या दोन्ही दिग्गज संघांनी मागील १० टी-२० सामन्यांपैकी प्रत्येकी आठ सामने जिंकले आहेत आणि प्रत्येकी एक सामना गमावला आहे. भारताचा एक सामना बरोबरीत सुटला, तर ऑस्ट्रेलियाचा एक सामना पावसामुळे रद्द झाला. कर्णधाराचा प्रदीर्घ खराब फॉर्म चिंतेचा विषय असला, तरी भारतीय टी-२० संघ राष्ट्रीय स्तरावरील तीन संघांपैकी सर्वोत्तम ठरला आहे. कर्णधारपदी नियुक्ती झाल्यापासून सूर्यकुमारने आतापर्यंत २९ सामन्यांमध्ये



२३ विजय मिळवून दिले आहेत. कोणत्याही परिस्थितीत आक्रमकता आणि सूर्यकुमारचे नेतृत्व कौशल्य संघासाठी अत्यंत यशस्वी ठरले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने सर्व द्विपक्षीय मालिका जिंकल्या आहेत आणि आशिया चषकही जिंकला आहे.

पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने भारताच्या खऱ्या तयारीला ऑस्ट्रेलिया मालिकेपासून सुरुवात होत आहे आणि लय मिळवण्यासाठी संघाकडे १५ सामने आहेत. मात्र, या मालिकेच्या निकालाचा फार मोठा परिणाम होणार नाही, असे म्हटले जाऊ शकते. याचे कारण म्हणजे दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडविरुद्धचे पुढील १० सामने घरच्या मैदानावर, म्हणजेच टी-२० विश्वचषकात मिळणाऱ्या संभाव्य परिस्थितीसारख्याच वातावरणात खेळले जातील. आशिया चषकात देशभरात कौतुकाचा विषय ठरलेल्या अभिषेक शर्मासारख्या खेळाडूसाठी ऑस्ट्रेलियन खेळपट्ट्यांवरील अतिरिक्त उसळीचा सामना करणे एक नवीन आव्हान असेल. त्यामुळे कर्णधाराचे योगदान अधिक महत्त्वाचे ठरते. सूर्यकुमारची समस्या म्हणजे त्याच्याकडे असलेल्या फटक्यांची मर्यादित श्रेणी आणि चेंडूची गती व उसळी वापरून नेहमी स्क्वेअरच्या मागे खेळण्याचा प्रयत्न करणे. मनुका ओव्हलच्या खेळपट्टीवरील उसळी त्याला फायदा मिळवून देण्याची संधी देते; पण जोश हेझलवूडचा पेचात टाकणारा मारा आणि कसोटी सामन्यांप्रमाणे ऑफ-स्टंपच्या बाहेरील टप्प्यावर टाकलेले चेंडू त्याच्यासाठी अडचणी निर्माण करू शकतात.

### मागील ३ वर्षांतील सूर्यकुमारचे योगदान

२०२३ मध्ये सूर्यकुमारने १८ डावांत जवळपास १५६ च्या स्ट्राईक रेटने ७३३ धावा केल्या. यात २ शतके आणि ५ अर्धशतकांचा समावेश होता. त्यानंतर २०२४ मध्ये त्याने १५१ च्या स्ट्राईक रेटने ४५० पेक्षा कमी धावा जमवल्या. या वर्षात मात्र त्याला १० डावांत केवळ ११ च्या सरासरीने १०० धावा करता आल्या आहेत. यामध्ये एक गोष्ट अपवाद म्हणून समोर येते ती म्हणजे, त्याचा १०५ पेक्षा जास्त असलेला स्ट्राईक रेट. यावरून असे दिसून येते की, धावा करण्यासाठी संघर्ष करत असतानाही त्याने आपला आक्रमक पवित्रा पूर्णपणे सोडलेला नाही.

## वनडे रँकिंगमध्ये स्मृतीचे वर्चस्व कायम!

**दुबई :** आयसीसी महिला एकदिवसीय वर्ल्डकप स्पर्धेत भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधना हिने चमकदार कामगिरी केली आहे. तिने न्यूझीलंडविरुद्धच्या शतकी खेळीच्या बळावर महिलांच्या एकदिवसीय क्रिकेटमधील नंबर १ फलंदाज म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. विश्वचषकातील शानदार प्रदर्शनामुळे मानधनाचे रेटिंग तिच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम स्तरावर पोहोचले आहे. तिची सहकारी, प्रतिका रावलने देखील १२ स्थानांची मोठी झेप घेतली आहे.



स्मृती मानधनाने न्यूझीलंडविरुद्ध १०९ धावांची खेळी केली. तर बांगलादेशविरुद्ध नाबाद ३४ धावा केल्या. ती ८२८ रेटिंगसह अव्वल स्थानावर कायम असून, दुसऱ्या स्थानावर असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या ॲश्ले गार्डनर (७३१) पेक्षा ती तब्बल ९७ गुणांनी पुढे आहे. १२ स्थानांची झेप घेऊन प्रतिका रावल ५६४ रेटिंगसह २७व्या स्थानावर पोहोचली आहे, परंतु दुर्दैवाने, दुखापतीमुळे ती आता या स्पर्धेतील उर्वरित सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही.

स्मृतीने विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतही उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्या कामगिरीची दखल आयसीसीने घेतली होती आणि तिची सप्टेंबर २०२५ साठी 'आयसीसी महिला प्लेयर ऑफ द मंथ' म्हणून निवड करण्यात आली होती. दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्व्हाड्र्ट दोन स्थानांची झेप घेऊन तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. तिने अलीकडेच पाकिस्तानविरुद्ध ९०, तर ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३१ धावांची खेळी केली होती. दरम्यान, इंग्लंडच्या ॲमी जोन्सने 'टॉप-१०' मध्ये स्थान मिळवले आहे. ती ४ स्थानांची झेप घेऊन ९व्या (६५६) क्रमांकावर पोहोचली आहे. ॲनाबेल सदरलँडने 'टॉप ४०' मध्ये सर्वात मोठी झेप घेतली आहे. ती १६ स्थानांनी पुढे सरकत १६वे स्थान गाठले आहे. महिला गोलंदाजांच्या क्रमवारीत, सोफी एक्लेस्टोन (७४७) अव्वल स्थानावर कायम आहे. ऑस्ट्रेलियन फिरकीपटू अलाला किंग ५ स्थानांची झेप घेऊन दुसऱ्या स्थानावर पोहोचली आहे.

## भारत दौऱ्यासाठी द. आफ्रिकेचा संघ जाहीर, बवुमाचे पुनरागमन

**केपटाऊन :** कर्णधार टेम्बा बवुमा पोटरीच्या दुखापतीतून सावरला असून, भारताविरुद्धच्या २ कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी दक्षिण आफ्रिक न संघात त्याचे पुनरागमन झाले आहे. ही मालिका १४ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून, सामने गुवाहाटी आणि कोलकाता येथे खेळवले जाणार आहेत.

बवुमा अलीकडेच पाकिस्तानमध्ये झालेल्या दोन सामन्यांच्या मालिकेत खेळू शकला नव्हता. ही मालिका बरोबरीत सुटली होती. पाकिस्तान दौऱ्यावरील बहुतांश संघ कायम ठेवण्यात आला असून, डेव्हिड बेडिंगहॅमच्या जागी बवुम ाची संघात वर्णी लागली आहे.

मागील जागतिक कसोटी चॅम्पियनशिपम ध्ये आपल्या संघाला विजेतेपद मिळवून देणारा बवुमा, २ नोव्हेंबर रोजी बंगळूर येथे



सुरू होणाऱ्या भारत 'अ' संघाविरुद्धच्या सराव मालिकेतही खेळण्याची शक्यता आहे. याच मालिकेतून ऋषभ पंतही दुखापतीनंतर पुनरागमन करणार आहे. सायमन हार्मर, केशव महाराज आणि सेनुरन मुथुसामी या दक्षिण आफ्रिकेच्या फिरकी त्रिकुटाने पाकिस्तानमधील फिरकीला अनुकूल खेळपट्ट्यांवर उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्यामुळे येथेही द. आफ्रिकेची पुन्हा एकदा फिरकीवरच भिस्त असेल.

## द.आफ्रिकेविरुद्ध धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा पराभव



**नवी दिल्ली :** रावळपिंडीमध्ये पाकिस्तानला १९५ धावांचा पाठलाग करताना ५५ धावांनी पराभव पत्करावा लागला. पाकिस्तानी फलंदाज धावांचा पाठलाग करण्यात कधीच यशस्वी झाले नाहीत आणि दक्षिण आफ्रिकेतील गोलंदाजांच्या नियमित लाईन आणि लेन्थसमोर दबावाखाली कोसळले.

दक्षिण आफ्रिकेकडून कॉर्बिन बॉश हा गोलंदाजांमध्ये निवडक होता, त्याने त्याच्या चार षटकांत फक्त १४ धावा देत ४ बळी घेतले. दरम्यान, जॉर्ज लिंडेनेही आपल्या फिरकी गोलंदाजीने पाकिस्तानी फलंदाजांना झेलबाद केले आणि ३१ धावांत ३ बळी घेतले. लिझाद विल्यम्सने २ बळी घेतले तर लुंगी एनगिडी थोडा महागडा राहिला पण त्याला एक बळी मिळाला. दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजीबद्दल बोलायचे झाले तर, पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर क्विंटन डी कॉक आणि रीझा हेंड्रिक्स यांनी दक्षिण आफ्रिकेसाठी फलंदाजीची सुरुवात केली आहे. दोन्ही सलामीवीरांनी पॉवरप्लेमध्ये त्यांच्या संघाला चांगली सुरुवात करून दिली पण अखेर चौथ्या षटकात सैम अयुबला यश मिळाले. तेथून टोनी डी झोर्झी आणि हेन्ड्रिक्स यांनी धावगती कायम ठेवत पॉवरप्लेमध्ये ७० पेक्षा जास्त धावा केल्या. अखेर मोहम्मद नवाजने सलग षटकांत डी झोर्झी आणि डेवाल्ड ब्रेव्हिसचे दोन अत्यंत आवश्यक ब्रेकथ्रू मिळवून पाकिस्तानला स्पर्धेत परत आणले. नवाजने सामन्यात ३ बळी घेतले तर दुसऱ्या टोकाला अयुबने त्याला भरपूर साथ दिली. एकेकाळी धावा काढत असलेल्या आफ्रिकेच्या संघाला अखेर १९४ धावांवरच रोखण्यात आले. आफ्रिकेच्या फलंदाजी लाइनअपमध्ये ५० धावांचा टप्पा ओलांडणारी रीझा हेंड्रिक्स ही एकमेव खेळाडू होती. दक्षिण आफ्रिका विरुद्ध पाकिस्तान पहिला टी२० लाईव्ह स्कोअर: पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी२० सामन्यात ५५ धावांनी पराभव पत्करला. मोहम्मद नवाज हा एका धाडसी खेळीनंतर शेवटचा फलंदाज ठरला पण धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानला खरोखरच संधी मिळाली नाही. पुढील टी२० सामन्यापूर्वी पाकिस्तानच्या संघाला खूप आत्मपरीक्षण करावे लागेल.

# तान्या मित्तलने बिग बॉसच्या घरात चक्क शिव्या दिल्या?



**मुंबई :** बिग बॉस १९च्या घरात रोज एक नवीन ड्रामा घडताना दिसतो आहे. सोमवारी मात्र या घरात असे काही घडले की सदस्यही अवाक झाले. घरात आपल्या सुशील आणि संस्कारी इमेजसाठी तान्या मित्तल कायमच अतोनात प्रयत्न करत असते. पण आता असे काही घडले आहे की तिच्या या इमेजवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

सलमान होस्ट करत असलेल्या घरात तान्याने आध्यात्मिक व्यक्ती अशी इमेज निर्माण केली आहे. पण घरातील वादविवादादरम्यान तिने चक्क अभिषेक बजाजला शिवीगाळ केली आहे. नुकत्याच समोर आलेल्या प्रोमोमध्ये तान्या अभिषेकला माफी मागण्यास सांगते. पण अभिषेक घरात ॲटीट्यूड दाखवतो आणि माफी मागणार नाही असे सूनवतो. यानंतर ती म्हणते, 'अबे अबे....अशनूर कम से कम सॉरी तो फील कर रही है और तू ***** आकर सीधा गले मिलना चाहता है' हे ऐकताच अभिषेक तिच्यावर भडकतो. '****** क्या होता है. गाली किसको दे रही है . यावरून अभिषेक आणि तान्याची चांगलीच जुंपते.

अर्थात व्हीडियोमध्ये या दोघांच्या आवाजातील शिव्या म्युट केल्या आहेत. अभिषेक बजाज आणि अशनूर कौर यांनी माइक न बोलताना दिसतात. त्यामुळे बिग बॉस त्यांच्यावर भडकले आहेत. घरातील एका टास्क दरम्यान घरातल्यांना अशी पॉवर मिळते की ते अशनूर अभिषेकला एलिमिनेशनसाठी नॉमिनेट करतात. पण गौरव खन्नामुळे हा टास्क रद्द होतो. परिणामी, या आठवड्यात संपूर्ण घर नॉमिनेट झाले. या कारणामुळे घरात मोठा गोंधळ उडाला.

# मेगास्टार चिरंजीवी डीपफेकचा बळी




**हैदराबाद :** तेलुगू चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेता आणि मेगास्टार चिरंजीवी यांचे एआय-जनरेटेड डीपफेक पोर्नोग्राफिक व्हिडिओ सोशल मीडियावर आणि विविध अश्लील वेबसाइट्सवर प्रसारित झाल्यानंतर खळबळ उडाली आहे. या घृणास्पद कृत्याविरोधात चिरंजीवींनी हैदराबाद सायबर क्राईम पोलिसांकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७ आणि ६७ए, भारतीय दंड संहिता (आयपीसी) च्या कलम २९४, २९६, ३३६(४) तसेच महिलांचे अश्लील प्रतिनिधित्व (प्रतिबंध) कायदा, १९८६ च्या कलम २(क), ३ आणि ४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिरंजीवी यांनी त्यांच्या तक्रारीत नमूद केले आहे की कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे तयार केलेले हे बनावट व्हिडिओ त्यांची प्रतिमा आणि प्रतिष्ठा मलिन करण्याच्या उद्देशाने प्रसारित करण्यात आले आहेत.

# १० वर्षांनंतर सूरज पांचोलीने बॉलिवूडमधून घेतला संन्यास

**पुणे :** अवघ्या १० वर्षांच्या करिअरनंतर प्रसिद्ध अभिनेत्याने बॉलिवूडला रामराम ठोकण्याचा निर्णय घेतलाय. हा अभिनेता आहे सूरज पांचोली. सूरजने बॉलिवूडमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याने सिनेसृष्टीत खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे त्याचे वडील आणि अभिनेते आदित्य पांचोली यांनी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गजांवर अप्रत्यक्ष टीका केली आहे.



सूरज पांचोलीने 'हीरो' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. सलमान खानने सूरजला या सिनेमातून बॉलिवूडमध्ये लाँच केलं होतं. परंतु आता सूरजने इंडस्ट्रीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने मागे एका मुलाखतीत सांगितलं की, 'हीरो' चित्रपटानंतर त्याला अपेक्षेप्रमाणे काम मिळालं नाही आणि काही विशिष्ट लोकांना तो चित्रपटसृष्टीत असणं आवडत नाही, त्यामुळे सूरजने बॉलिवूड सोडण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थात सूरजने याविषयी अधिकृत घोषणा केली नाही तरीही त्याचे वडील आणि अभिनेता आदित्य पांचोली यांनी याविषयी सांगितलं आहे.

सूरजच्या या निर्णयावर आदित्य पांचोली यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी 'तेजाब' या गाजलेल्या चित्रपटाचा उल्लेख करत अनिल कपूर आणि बोनी कपूर यांच्यावर अप्रत्यक्ष निशाणा साधला. आदित्य पांचोली म्हणाले, 'मी तेजाब या सिनेमात माधुरी दीक्षितसोबत काम करणार होतो. मी या सिनेमासाठी पहिली पसंती होतो. पण एका अभिनेत्याच्या मोठ्या भावाने यात मध्यस्थी केली आणि त्या चित्रपटात माझ्याऐवजी दुसऱ्या अभिनेत्यासोबत दिग्दर्शकाने काम केलं.'

सूरजने बॉलिवूड सोडलं याबद्दल कमाल आर खानने ट्विट केलं होतं. हेच ट्विट आदित्य यांनी रिपोस्ट केल्याने या बातमीला पुष्टी मिळाली. आता बॉलिवूड सोडल्यानंतर सूरज पांचोली त्यांच्या व्यवसायाकडे लक्ष देणार असल्याचं सांगितलं जातंय. विशेष म्हणजे, सूरजच्या 'हीरो' सिनेमातून सुनील शेट्टीची लेक अथिया शेट्टीनेही पदार्पण केलं होतं. परंतु अथियानेही काही महिन्यांपूर्वी बॉलिवूडला रामराम ठोकण्याचा निर्णय घेतला.



# रश्मिका तिच्या न जन्मलेल्या मुलांसाठी युद्धात जाण्यास तयार..

**मुंबई :** फेब्रुवारीमध्ये विजय देवरकोंडासोबत लग्न करण्यापूर्वी, अभिनेत्री रश्मिका मंदाना हिने उघडपणे सांगितले की ती कधीतरी मुले होण्यासाठी किती उत्सुक आहे. एका मुलाखतीत, रश्मिका म्हणाली की तिला आधीच त्यांचे खूप संरक्षण वाटते आणि त्यांच्यासाठी युद्धात जाण्यासही तयार आहे. ती काय म्हणाली ते येथे आहे.

द गर्लफ्रेंडचे दिग्दर्शक राहुल रविंद्रन यांनी एका मुलाखतीत सांगितले की, एक वडील म्हणून, त्यांना वाटते की त्यांच्या मुलांना त्यांची गरज आहे तोपर्यंत त्यांना जिवंत राहण्याची आवश्यकता आहे. त्यांनी नमूद केले की रश्मिकाला आता जे काही वाटते तेच, जेव्हा तिला मुले होतील तेव्हा तिला आणखी तीव्रतेने वाटेल.

तिने होकार दिला आणि उत्तर दिले, ङ्गमी आईही नाहीये, पण मला आधीच वाटतंय... मला माहित आहे की मला मुले होणार आहेत, आणि मला ते घडणार आहे हे खूप आवडतं. पण मला आधीच या लहान मानवांबद्दल खूप तीव्र भावना आहेत जे अजून जन्मालाही आलेले नाहीत. मला त्यांच्यासाठी सर्व काही करायचे आहे. मला त्यांना इतके सुरक्षित, इतके संरक्षित ठेवायचे आहे. आणि जर मला युद्धात उतरायचे असेल तर मला त्यांच्यासाठी युद्धात जाण्यासाठी पुरेसे तंदुरुस्त असणे आवश्यक आहे. मी आधीच त्याबद्दल विचार करत आहे.

रश्मिकाने असेही नमूद केले की तिच्या आयुष्याची एक वेळापत्रक आहे आणि सध्या, ती कठोर परिश्रम करण्यावर आणि काम आणि कुटुंबाचा समतोल साधण्यात तिचे तीस वर्षे घालवण्यावर विश्वास ठेवते. ङ्गमाझ्या मनात नेहमीच असे होते की, वीस ते तीस, हे डोके खाली ठेवून काम करत राहण्यासारखे आहे. कारण समाजाने आपल्या डोक्यात तेच ठेवले आहे. आपल्याला उदरनिर्वाह करायचा आहे, आपल्याकडे स्वतःचे पैसे असले पाहिजेत. मला माहित होते की तीस ते चाळीस हे नेहमीच काम आणि जीवनाचे संतुलन असेल आणि मला ते घडेल याची खात्री करावी लागेल. आणि चाळीस नंतर, मी अजूनही इतका विचार केलेला नाही,ङ्घ तिने स्पष्ट केले. रश्मिकाने यावर्षी छावा, सिकंदर, कुबेरा आणि थामा या चित्रपटांमध्ये काम केले. 'द गर्लफ्रेंड' हा चित्रपट ७ नोव्हेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. तिच्याकडे कॉकटेल २ आणि 'म्यसा' हे चित्रपट देखील आहेत. विजय आणि रश्मिकाने या महिन्याच्या सुरुवातीला एका खाजगी समारंभात लग्न केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अनाथ व असुरक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी विशेष उपक्रम...

## शिक्षणाद्वारे आत्मनिर्भरतेचा प्रकाश निर्माण करावा -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील...

जनसंचलन/बुलडाणा

अनाथ बालकांच्या आयुष्यात शिक्षणाद्वारे आत्मनिर्भरतेचा प्रकाश निर्माण करणे हीच खरी सेवा आहे, असे प्रतिपादन करत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सर्व विभागांना समन्वयातून कार्य करून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. कोविड काळात अनाथ ठरलेल्या तसेच १८ वर्षांखालील दिव्यांग आणि भावनिकदृष्ट्या असुरक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी बुलढाणा जिल्ह्यात एक विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश अशा बालकांचे शिक्षण, आरोग्य, मानसिक आणि सामाजिक पुनर्वसन करून त्यांना आत्मनिर्भर आणि सुरक्षित बनविणे हा आहे. बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी वर्षा डिंगळे, बालसंरक्षण अधिकारी, तसेच पोलिस, शिक्षण, आरोग्य आणि महिला व बालविकास विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान जिल्ह्यातील अशा बालकांची सध्यस्थिती तपासून त्यांच्या शिक्षण, आरोग्य व पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी संबंधित सर्व विभागांना समन्वयातून कार्य करण्याचे निर्देश देत कोणतेही बालक शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचित राहू नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तत्काळ राबविण्याचे आदेश दिले. तसेच अशा उपक्रमामुळे जिल्ह्यातील दिव्यांग, अनाथ व असुरक्षित बालकांच्या जीवनात शिक्षणाच्या माध्यमातून नव्या आशेचा व आत्मनिर्भरतेचा प्रकाश निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# सैनिक कल्याण विभागात लिपिक टंकलेखक पदांची भरती...



जनसंचलन/बुलढाणा

सैनिक कल्याण विभाग व त्याच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक टंकलेखक(गट-क) या एकूण ७२ पदांच्या भरतीसाठी फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुक माजी सैनिक उमेदवारांनी ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.एकूण पदांपैकी एक पद हे अंपग संवर्गासाठी राखीव असून, किमान ४० टक्के अंपगत्व असलेल्या उमेदवारांमधून दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्ये व जबाबदाऱ्या लक्षात घेऊन गुणवत्ता व उपलब्धतेनुसार भरती केली जाणार आहे. सदर भरती प्रक्रिया टीसीएस-आयओएन (..-) यांच्या माध्यमातून पार पडणार असून अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जाणार आहेत. इतर कोणत्याही माध्यमातून आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज या संकेतस्थळावरील रिर्सोसेस टॅब-रिक्रूटमेंट टॅब या पर्यायामधून सादर करावेत. अर्ज प्रक्रिया दि. १४ ऑक्टोंबरपासून सुरु झाली असून अंतिम मुदत दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत आहे. त्यानंतर वेबलिंक बंद होईल, यांची नोंद घ्यावी, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील मुंबई क्लायमेट वीकचे मुंबईत आयोजन-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

## तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्त्यांचा समावेश

वृत्तसंस्था/मुंबई

वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह - ङ्गमुंबई क्लायमेट वीकफ ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हा महत्त्वाकांक्षी उपक्रम ङ्गप्रोजेक्ट मुंबईफ या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

विकसनशील देशांतील वातावरणीय बदल, अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडेल. त्याचबरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी शहरभर विविध प्रदर्शने, कार्यशाळा, चित्रपट, कला, क्रीडा, आरोग्य आणि अध्यात्म यांच्याशी निगडीत उपक्रम, आणि क्लायमेट फूड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या परिषदेत ग्लोबल साऊथमधील ३० पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री, विविध शहरांचे प्रतिनिधी, उद्योग, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट विकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो. माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य, नाविन्यपूर्ण, चांगल्या निधीसह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत. ग्लोबल साउथमधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रामधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईत पहिल्यांदाच मुंबई क्लायमेट वीकङ्घ कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे. यासाठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे.



मुंबई क्लायमेट वीक कार्यक्रम आयोजित केल्यानंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील, हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील. त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले. तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदलावरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल, असेही ते म्हणाले. मुंबई क्लायमेट वीकचा भर अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी सक्षमता या तीन प्रमुख विषयांवर असेल. न्याय, नवोन्मेष आणि वित्तीय दृष्टीकोनातून हे विषय सखोलपणे मांडले जातील.

# क्रांतीकारी शेतकरी संघटनेचा बच्चू कडू यांच्या महाएल्गार आंदोलनास जाहीर पाठिंबा! रविकांत तुपकर यांचा सक्रिय सहभाग..

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या ङ्गमहाएल्गारफ आंदोलनास आता क्रांतीकारी शेतकरी संघटनेचा सक्रिय व भक्कम पाठिंबा मिळाला आहे. या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी स्वतः आंदोलनात सहभागी होत शेतकरी चळवळीला नवी उर्जा दिली आहे. आज, मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी नागपूरच्या परसोडी येथील कपाशी संशोधन केंद्राजवळील मैदानावर बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा ङ्गमहाएल्गारफ सुरू झाला आहे. विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून आलेले शेतकरी या ठिकाणी एकवटले असून, शेतकऱ्यांच्या न्यायाच्या प्रश्नावर शासनाला जाग आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळली आहे. सर्व शेतकरी नेत्यांनी बच्चु कडु यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे सर्व शेतकरी नेत्यांची एकजुट यानिमित्ताने पहायला मिळाली शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सक्रिय सहभाग घेऊन वर्धा येथुन आंदोलनात सहभागी होत बच्चु कडु यांच्या सोबत ट्रॅक्टर वरून प्रवास करत आपल्या हजारो मावळ्यांसोबत आंदोलन स्थळाकडे कुच केले शेतकरी हितासाठी झटणारे हे दोन लढवय्ये नेते बच्चू कडू आणि रविकांत तुपकर एकाच मंचावर आल्याने शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या प्रसिद्धीपत्रकात रविकांत तुपकर यांनी म्हटले आहे की, ङ्घशेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची मागणी ही केवळ आर्थिक नव्हे, तर अस्तित्वाची लढाई आहे. शेती उद्ध्वस्त झाली आहे, शेतकरी कर्जात बुडाला आहे. अशा परिस्थितीत बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेलं ङ्गमहाएल्गारफ हे शेतकऱ्यांच्या जगण्याचा आवाज आहे. मी आणि माझ्या संघटनेचे सर्व मावळे या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी नागपूर येथे जमलो आहोत. जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत माघार नाही!



# फलटण येथील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी...

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्या वतीने मा.मुख्यमंत्री यांना निवेदन



**जनसंचलन/बुलढाणा**

फलटण (जि. सातारा) येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांनी आत्महत्या केल्याची घटना संपूर्ण राज्याला हादरवणारी आहे. त्यांच्या मृत्यूपूर्वी स्वतःच्या तळहातावर लिहिलेल्या मजकुरातून पोलीस निरीक्षक गोपाल बदने यांच्याकडून बलात्कार तसेच प्रशांत बनकर व इतरांकडून मानसिक व शारीरिक छळ झाल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. या आत्महत्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी बुलढाणा जिल्हा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने मा.जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्फत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या संदर्भात डॉ. मुंडे यांनी तत्कालीन पोलीस अधिक्षक श्री. अनिल महाडीक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राहुल धस यांच्याकडे वारंवार तक्रार केली असूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले, ही बाब अत्यंत गंभीर आहे. पोलीस यंत्रणेतील अधिकाऱ्यांवरच असे आरोप होणे हे कायदा सुव्यवस्थेच्या आणि राज्य प्रशासनाच्या प्रतिमेच्या दृष्टीने चिंताजनक आहे. याशिवाय, आरोपींना संरक्षण देण्यासाठी सत्ताधारी पक्षाशी संबंधित माजी खासदार रणजीत नाईक-निंबालकर तसेच त्यांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र शिंदे आणि रोहित नागतिळे स्थानिक प्रशासनावर अनुचित प्रभाव टाकत असल्याचेही समोर आले आहे. अशा प्रकारचा राजकीय हस्तक्षेप हा संविधान आणि कायद्याच्या शासनाच्या तत्त्वांना विरोधी आहे. डॉ. मुंडे यांनी आपल्या सेवाकालात वैद्यकीय प्रामाणिकतेने काम करताना काही प्रकरणांमध्ये पोलीस दबाव नाकारला होता, त्यामुळेच त्यांच्या छळाची तीव्रता वाढली. त्यांनी या संदर्भात लेखी तक्रारी केल्या होत्या व माहिती अधिकाराखाली अर्जही दाखल केला होता. मात्र योग्य वेळी कारवाई न झाल्याने अखेरीस त्यांनी आत्महत्या करून जीवन संपविले. या प्रकरणात पोलिसांकडून निष्क्रियता, शवविच्छेदनात झालेला विलंब आणि प्राथमिक तपासातील त्रुटी या बाबी चौकशीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. तसेच, मृत व्यक्तीचे चरित्रहनन करण्याचा प्रयत्न काही समाजमाध्यमांतून सुरू आहे, ही बाबही अत्यंत निंदनीय आहे. या सर्व घटनांवरून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी होणे अत्यावश्यक आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासकीय सुधारणा तातडीने राबवाव्यात, अशी मागणी बुलढाणा जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंदाताई बढे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख विजया खडसान, उपजिल्हाप्रमुख प्रतिक्षा पिंपळे, रत्ना शेळके, अनिता गायकवाड, सुनिता गाकवाड, स्मिता वराडे, शितल सुरडकर, सपना इंगळे, वंदना मेढे, श्रध्दा आराख, कविता भागीले, संगीता सोनुने, सुवर्णा जाधव, बेबी परिहार, सुनिता सुरडकर, शारदा दाभाडे, सरला चौथनकर, सविता राऊत, आरती जाधव, सुनिता दराखे, सोनाली वाघ, मिना इंगळे यांच्यासह अनेक महिला उपस्थितहोत्या.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८